मुंबई केंद्र

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

## दूरशिक्षण विद्याशाखा

एम.ए. - मराठी

२०११-२०१२

## वर्षभराच्या कामकाजाबाबतचे सूचनापत्र

जा.क्र. दि. डिसेंबर २०११

विद्यार्थी मित्रांनो,

टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये आपल्या सर्वांचे मन:पूर्वक स्वागत!

दूरशिक्षण पध्दतीने चालविण्यात येणा-या एम.ए. (मराठी) अभ्यासक्रमाच्या कामकाजाबाबतच्या खालील सूचना तुम्हा सर्वांना मार्गदर्शक आणि उपयुक्त ठरतील.

- **अभ्यासक्रमाबाबत सर्वसाधारण महत्त्वपूर्ण सूचना :** विद्यापीठ नियमानुसार २०११-२०१२ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम तसेच द्वितीय वर्षांच्या सर्व विद्यार्थ्यांनी भाग १ ला प्रवेश घेणे अपेक्षित आहे. कारण यंदाच्या वर्षाचे सर्व कामकाज भाग १ ला अनुसरून होणार आहे. (पुनर्परीक्षार्थींच्या सोईसाठी परीक्षा मात्र भाग१ व भाग२ या दोन्हींची होईल याची नोंद घ्यावी.)
- विद्यार्थी मित्रांनो, आतापर्यंत तुम्हाला विद्यापीठातर्फे पुरविण्यात येणारे अध्ययन साहित्य मिळालेच असेल.
  ***(विद्यापीठामार्फत पुरविण्यात येणारे साहित्य हे मार्गदर्शक साहित्य या स्वरुपाचे आहे. नेमण्यात आलेल्या क्रमिक पुस्तकांना हे साहित्य पर्यायी नाही याची कृपया नोंद घ्यावी.)***
- **अभ्यासक्रम पुस्तिका :** अभ्यासक्रमाच्या सविस्तर पाठ्यक्रमाची पुस्तिका सर्व विद्यार्थ्यांकडे असणे अत्यावश्यक आहे. पुणे येथील विद्यार्थ्यांनी ती विद्यापीठाच्या गुलटेकडी येथील प्रकाशन विभागातून घेऊन जावी. बाहेरील केंद्रांवरील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या ठिकाणाहून या पुस्तिकेची प्रत घ्यावी. या पुस्तिकेमध्ये खालील बाबींचा समावेश आहे.
  - अभ्यासक्रमाचे सर्वसाधारण स्वरूप
  - प्रश्नपत्रिकेचे स्वरूप
  - प्रत्येक विषयाचा / प्रश्नपत्रिकेचा तपशीलवार पाठ्यक्रम
  - संदर्भ ग्रंथांची यादी

  ***(प्रस्तुत अभ्यासक्रम पुस्तिका विद्यापीठाच्या** www.tmv.edu.in **या वेबसाईटवरही उपलब्ध आहे.)***

- **पायाभूत व अतिरिक्त वाचनासाठी सुविधा व सूचना :** दादर, मुंबई येथील मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचा लाभ विद्यार्थ्यांना घेता येईल. अभ्यासक्रमाच्या निमित्ताने आपण काही ग्रंथ विकत घेऊ शकता. त्यासाठी छबिलदास हायस्कूल (दादर) समोरील पॉप्युलर बुक हाऊस येथे चौकशी करावी.
- **संपर्कसत्र / विषयांचे मार्गदर्शन** : एम.ए. मराठी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी डिसेंबर २०११ पासून मराठीचे तास मुंबई येथे सुट्टीच्या दिवशी आयोजित करण्यात येतील. संपर्कसत्राचा तपशील श्री. मांढरे यांच्याकडून आपणास कळविण्यात येईल. (श्री. मांढरे - फोन नं. ०२५१-२४२५३८६)
- **नमुना प्रश्नपत्रिका :** विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन यंदा विद्यापीठाच्या वेबसाईटवर भाग १ च्या नमुना प्रश्नपत्रिका उपलब्ध करून दिल्या जातील.
- **परीक्षेचा कालावधी** - यंदाची वार्षिक परीक्षा मे २०१२ मध्ये साधारणत: दुस-या पंधरवड्यात होईल. (कालावधीबाबतचा हा अंदाज असून या कालावधीमध्ये काही कारणाने बदल होऊ शकतो यांची नोंद घ्यावी.) परीक्षेचे वेळापत्रक पुरेसे आधी विद्यार्थ्यांना पाठविले जाते. तसेच ते आपण प्रवेश घेतलेल्या केंद्रावरही उपलब्ध होईल.

  पुनर्परीक्षार्थींसाठीची परीक्षा २० डिसेंबर २०११ पासून सुरू होत आहे.

२०११-२०१२ या शैक्षणिक वर्षासाठी सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा!

***विद्यापीठातील आपल्या शैक्षणिक अनुभवाबाबतची, विशेषत: अध्ययन साहित्य व संपर्कसत्र याबाबतची आपली मते पत्राद्वारे आम्हाला जरूर कळवा.***

*नीलिमा कुलकर्णी*
अभ्यासक्रम समन्वयक